नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २८६ Issue - 286 | वार रविवार दि. ८ मार्च २०२६ Blow- Sunday Date 8 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

लातूरजवळ भीषण अपघातात चौघांचा जागीच मृत्यू, २ जखमी

औसा-तुळजापूर महामार्गावर घडली दुर्घटना; बीएमडब्ल्यू कार लाकडाच्या कंटनेरला धडकली

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

लातूर: जिल्ह्यातील औसा शहराजवळील औसा-तुळजापूर महामार्गावर शुक्रवारी रात्री भीषण अपघाताची घटना घडलीय. भरधाव बीएमडब्ल्यू कारने लाकडाची वाहतूक करणाऱ्या आयशर टेम्पोला मागील बाजूने धडक दिली. या घटनेत कारमधील ४ जणांचा जागीच मृत्यू झाला असून, दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. महामार्गावर शुक्रवारी रात्री १०.१५ वाजता तीन वाहनांचा विचित्र भीषण अपघात झाला. भरधाव बीएमडब्ल्यू कारने ट्रक आणि कंटेनरला जोराची धडक दिली. यात कारमधील चौघांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी आहेत. अपघातानंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले.

सांगली येथील कार (एमएच ०४ ईजी ७५००) काही कामानिमित्त लातूरला आली होती. काम आटोपल्यानंतर शिवली येथे जेवण केल्यानंतर सहकाऱ्याला सोडण्यासाठी ही कार औशाकडे येत होती. औशानजीक एका हॉटेलसमोर पुढे चाललेल्या लाकडाने भरलेल्या ट्रकला (एमएच २५ यू ०५२२) आणि एका कंटेनरला (एमएच १२ एफसी ७६४२) पाठीमागून कारने धडक दिली. त्यानंतर लाकडी ट्रक शंभर फूट पुढे जाऊन उलटला, तर कार पूर्णपणे चक्काचूर होऊन रस्त्यालगतच्या खड्ड्यात कोसळली. अपघातात मृत्यू झालेले तिघे हे औसा तालुक्यातील बोरगाव (न.) येथील रहिवासी आहेत. चालक धनराज काशीनाथ जाधव (४९, रा. सांगली), आबासाहेब साळुंके (३६), शुभम शेषेराव पाटील (२६), किसन रामलिंग साळुंके (४९, तिघेही रा. बोरगाव) यांचा जागीच मृत्यू झाला, तर अपघातात जयहिंद विश्वास जाधव (३०, रा. औसा) आणि विनायक श्रीकांत हालदर (२८, रा. सांगली) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. सांगली येथील धनराज जाधव हे व्यापारी होते. बोरगाव येथील तरुणांच्या मदतीने ते औसा तालुक्यासह जिल्ह्यात व्यवसायाचे जाळे निर्माण करीत होते.

दरम्यान, घटनेची माहिती कळताच औसा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य करून जखमींना रुग्णालयात हलवले. दरम्यान, अपघातामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

संभाजीनगर जिल्ह्यात समृद्धी महामार्गावरील नाथनगर (वडखा) शिवारात दुभाजकाच्या क्रैश बॅरिअर प्लेट बदलताना सुसाट कंटेनरने कामाचे साहित्य घेऊन उभ्या असलेल्या सर्व्हिस ट्रकला धडक दिली. अतिशय वेगामुळे ट्रकच्या आडोशाला जेवणासाठी बसलेल्या तीन कामगारांना चिरडून कंटेनर पुढील जेसीबीवर आदळला. यात चिरडले गेलेल्या तिन्ही कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तिघे गंभीर जखमी झाले. शुक्रवारी दुपारी १.३० वाजता हा अपघात घडला.

युद्धजन्य परिस्थितीत भारताने शांततेसाठी पुढाकार घ्यावा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अहिल्यानगर : जगाचं लक्ष सध्या अमिरेका इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाकडे लागले असून युद्धाविराम कधी होईल, याचीच वाट सर्वजण पाहात आहेत. या युद्धाचे परिणाम जागतिक पातळीवर होत असून हजारो नागरिक मृत्युमुखी पडले आहेत. भारतानेही युद्धसंदर्भाने भूमिका स्पष्ट करत युद्ध थांबवण्याची गरज व्यक्त केली आहे. तसेच, आखाती देशात अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी संबंधित नेत्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी फोनवरुन संपर्कही केला होता. त्यातच, आता ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहून युद्धजन्य परिस्थितीत भारताने शांततेसाठी पुढाकार घेण्याची विनंती केली आहे.

अण्णा हजारेंचं पंतप्रधानांना पत्र; युद्ध परिस्थितीवर भाष्य, परखड भूमिका

जगातील वेगवेगळ्या देशात वाढत असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने शांततेसाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केली आहे. जगभरात सुरू असलेल्या संघर्षांमुळे सामान्य नागरिक, महिला आणि मुलांवर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता अण्णा हजारे यांनी व्यक्त केली आहे. भारताची संस्कृती अहिंसा आणि शांततेची असून भारताने जगासमोर संवाद आणि शांततेचा मार्ग पुढे करावा, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. युद्धामुळे विनाश होतो, तर संवादातूनच स्थैर्य आणि समाधानाचा मार्ग निघतो. त्यामुळे भारताने तटस्थ आणि जबाबदार भूमिका घेत जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा अण्णा हजारे यांनी व्यक्त केली आहे.

युद्धाच्या पार्श्वभूमीवर अलीकडील घटनांमध्ये निरपराध महिला, मुले आणि कुटुंबांवर होत असलेल्या परिणामांच्या बातम्या अत्यंत दुःखद आणि वेदनादायी आहेत. युद्ध आणि संघर्षाचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांनाच बसतो, ही बाब लक्षात घेऊन जागतिक स्तरावर भारताकडून शांततेसाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. भारताची परंपरा ही अहिंसा, शांतता आणि संवादाची राहिली आहे. इतिहासात भारताने नेहमीच जगाला संवादाचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. अशा परिस्थितीत भारतासारख्या मोठ्या लोकशाही राष्ट्राकडून मानवता आणि शांततेचा संदेश जाणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही अण्णा हजारे यांनी पंतप्रधान मोदींना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

जगाला शस्त्राची नव्हे, संवादाची गरज

आजच्या जगाला शस्त्रांची नव्हे तर विश्वास, सहकार्य आणि संवादाची गरज आहे. युद्धामुळे केवळ विनाश होतो, तर संवादातून समाधान आणि स्थैर्याचा मार्ग निर्माण होऊ शकतो. त्यामुळे भारताने तटस्थ आणि जबाबदार भूमिका घेत जागतिक स्तरावर शांततेला प्रोत्साहन देण्यासाठी मोदींनी पुढाकार घ्यावा, अशी विनंती करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने अनेक जागतिक प्रश्नांवर सकारात्मक भूमिका बजावली आहे. त्यामुळे या संवेदनशील काळात भारताने मानवतेच्या आणि शांततेच्या बाजूने पुढे येत संवाद आणि सहकार्याचा मार्ग मजबूत करावा, अशी अपेक्षाही हजारे यांच्याकडून व्यक्त करण्यात आली आहे.

चंद्राबाबू सरकारची नवी योजना, तिसरे अपत्य जन्मल्यास २५ हजार निधी, मुलाचे १२ वीपर्यंत शिक्षणही मोफत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

हैदराबाद: जगातील सर्वात मोठी लोकसंख्या असलेला देश म्हणून भारताने चीनला मागे टाकत पहिलं स्थान पटकावले आहे. १४० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात नेहमीच मुले जन्माला घालण्यावरुन चर्चा होत असते. कुणी हिंदूंनी १० मुले जन्माला घातली पाहिजे, असे म्हणतो, तर कुणी ४ मुले जन्माला घालण्याचा सल्ला देतो. विशेष म्हणजे भारत सरकारने हम दो-हमारे दो म्हणत दोन मुलांच्या जन्मासाठीच आग्रह धरला आहे. मात्र, आता आंध्र प्रदेश सरकारकडून तिसऱ्या मुलाच्या जन्माचे स्वागत केले जाणार आहे. राज्यातील जन्मदर घटत असल्याने आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी थेट विधानसभेतच याबाबतची घोषणा केली. राज्य सरकारने लोकसंख्येसंदर्भात नवी नीती आखत असून दुसऱ्या आणि तिसऱ्या अपत्यासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे.

दक्षिण भारतातील काही राज्यांत जन्मदर सातत्याने घटत असल्याचं आकडेवारीवरुन समोर येत आहे. त्यामुळेच, काही राज्य सरकारने लोकसंख्या कमी करण्याऐवजी संतुलन कायम ठेवण्यासाठी योजना आखत आहे. त्यानुसार, आंध्र प्रदेश सरकार तिसऱ्या अपत्यास २५,००० रुपये प्रोत्साहन अनुदान देणार असल्याची माहिती आहे.

आंध्र प्रदेशच्या चंद्राबाबू नायडू यांच्या प्रस्तावित नव्या लोकसंख्या नितीनुसार, दुसरे किंवा तिसरे अपत्य जन्मलेल्या पालकांना २५००० रुपये प्रोत्साहन निधी दिला जाईल. तसेच, तिसऱ्या अपत्यासाठी विशेष सुविधा देण्याचीही संकल्पना आहे. त्यानुसार, तिसऱ्या मुलास वयाच्या

५ वर्षांपर्यंत दरमहा १००० रुपये, वयाच्या १८ वर्षांपर्यंत मोफत शिक्षण देण्याचा सरकारचा मानस आहे. या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळाल्यास अधिक मुलांसाठी दाम्पत्य विचार करतील, असे सरकारला वाटते. विशेष म्हणजे, मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत सरकारची नवी लोकसंख्या नीती निश्चित केली जाईल. त्यानंतर, १ एप्रिल पासून नवी लोकसंख्या निती योजना सुरू होऊ शकते.

महिलांनाही विशेष सवलती देणार

भविष्यात राज्यातील लोकसंख्या संतुलन कायम ठेवण्यास आणि लोकसंख्या जन्मदराची घट कमी करण्यात शासनाची ही योजना महत्त्वाची ठरेल. या योजनेसह महिलांनाही विशेष सवलत देण्यात येणार आहे. सरकार मातृत्व सेंटर ऑफ एक्सीलेंस स्थापन करणार आहे, जेथे आधुनिक आरोग्य सुविधा आणि आयवीएफ सारख्या सेवा दिल्या जातील. यांसह प्रत्येक ५० मुलांसाठी एक चाइल्ड केअर सेंटरही उभारण्यात येईल. महिलांच्या सुविधांसाठी पिंक टॉयलेट बनविण्यात येईल. तर, कर्मचारी महिलांसाठी विशाखापट्टनम येथे १७२ कोटींची खर्च करुन मोठं हॉस्टेल उभारण्यात येणार आहे. तसेच, सिजेरियन डिलीवरी कमी करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

ट्रॅफिक पोलिसांची माणुसकी; १२ वीच्या दोन विद्यार्थ्यांना बाईकवर बसवलं, परिक्षा केंद्रावर वेळेत पोहोचवले

ठाणे: वाहतूक पोलीस म्हटलं की केवळ वाहनधारकांना अडवून, नियमांच्या आडून पैशांसाठी तगादा लावणारे. लायसन्स, नंबर प्लेटवरुन वाहनधारकांची अडवणूक करणारे ट्रॅफिक हवालदार. मात्र, सध्या सुरू असलेल्या परीक्षांच्या हंगामात ठाणे शहर वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे बारावीच्या परीक्षेला जाणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहोचण्यास मोलाची मदत झाली. ठाणे शहर वाहतूक शाखेचे उप आयुक्त पंकज शिरसाट यांच्या निर्देशानुसार सहा. पोलीस आयुक्त किरण बालवडकर यांनी वाहतूक पोलिसांकरवी ग्रीन कॉरीडॉर सदृष्य तात्काळ कार्यवाही करीत विद्यार्थ्यांना अवघ्या काही मिनिटांत ७ किमी अंतरावरील परीक्षा केंद्रावर पोहोचवले. त्यामुळे, वाहतूक पोलिसांच्या खाकी-पांढऱ्या वर्दीतली माणुसकीचे दर्शन घडले. राज्यात आज दुपारी २.३० या वेळेत बारावी इयत्तेच्या भुगोल विषयाची परिक्षा होती. त्यामुळे, विद्यार्थी सुजित मिश्रा व त्याचा एक परिक्षार्थी मित्र अंबरनाथहून कल्याण येथे परीक्षा देण्यासाठी निघाले होते.

मुख्यमंत्र्यांकडून स्वागत, पुनर्वसन होणार

शांततेत व कुटुंबियांसह जीवन जगण्याचा घेतला निर्णय

१३० माओवाद्यांचं आत्मसमर्पण, एके ४७ रायफलसह ५२०५ जिवंत दारुगोळाही सोपवला

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

हैदराबाद : माओवाद्यांची (चरेळींं) सर्वात घातक तुकडी मानल्या जाणाऱ्या पीएलजीए (झडऋ) बटालियन क्रमांक १ सह तेलंगाना स्टेट कमिटी आणि दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीच्या तब्बल १३० माओवाद्यांनी तेलंगणा पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे. या १३० माओवाद्यांनी एके ४७, एलएमजी, एसएलआर, इंसास सारख्या १२४ घातक शस्त्रांसह तब्बल ५२०५ जिवंत गोळ्या तसेच अनेक ग्रेनेड आणि यूबीजीएल हे रॉकेट लाँचरसारखे शस्त्र देखील पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. त्यामुळे उरल्या सुरल्या शशस्त्र माओवादी चळवळीला मोठा धक्का बसला आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांच्यासमोर माओवाद्यांनी आत्मसर्पण केले.

आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये झडऋ बटालियन-१ व बटालियन-२ चे कमांडर एंड्री कलिथराम उर्फ उइके कल्लू, कोरसा लक्कू तसेच डीके एसझेडसी सदस्य चलसानी नवथा उर्फ चंद्रा यांसारखे वरिष्ठ माओवादी नेतेही आहेत. माओवादी संघटनेच्या तीन प्रमुख घटकांपैकी झशेश्रिशी डळलशीरींळेप त्रीशीळश्रश्रर ीू (झडऋ) ही महत्त्वाची संघटना होती. मोठ्या संख्येने कॅडरनी शरणागती पत्करल्याने या संघटनेचे अस्तित्व जवळपास

संपुष्टात आल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी हिंसाचाराचा मार्ग सोडून विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचे आवाहन केल्यानंतर अनेक नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करल्याचे तेलंगणा सरकारने म्हटले आहे. कुटुंबासोबत शांततेत जीवन जगण्यासाठी आणि पुनर्वसन योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांनी हा निर्णय घेतल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

आत्मसमर्पण करणाऱ्या १३० माओवाद्यांमध्ये सर्वाधिक ४२ माओवादी झडऋ बटालियन क्रमांक १ चे आहेत. तर ३० माओवादी तेलंगणा स्टेट कमिटीचे आहेत, १६ माओवादी सेंट्रल रीजनल कमांड चे आहेत. विशेष म्हणजे माओवाद्यांचा विद्यमान जनरल सेक्रेटरी देवजीने काही दिवसांपूर्वीच तेलंगाना पोलिसांसमोर आत्मसर्पण केले होते, त्याच देवजीच्या सुरक्षा तुकडीतील १० माओवाद्यांनी सुद्धा आज तेलंगणा पोलिसांसमोर शस्त्र खाली ठेवले. या आत्मसमर्पणानंतर तेलंगणा पोलिसांनी प्रेस नोटच्या माध्यमातून मोठा दावा करत आता तेलंगणामधील रहिवाशी असलेले फक्त ७ माओवादी सशस्त्र माओवादात सक्रिय असल्याचे म्हंटले आहे. विशेष म्हणजे या सात पैकी फक्त एकच माओवादी आता तेलंगणामध्ये सक्रीय असून उर्वरित सर्व छत्तीसगड, झारखंड या भागामध्ये सक्रिय असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे एकाप्रकारे तेलंगणा मधून सशस्त्र माओवाद संपुष्टात आल्याचा दावा तेलंगणा पोलिसांनी केला आहे.

तेलंगणा सरकारच्या पुनर्वसन धोरणानुसार शरणागती पत्करलेल्या नक्षलवाद्यांच्या वरिष्ठ म्होरक्यांना २० लाख रुपये, DVCM/CyPCM² स्तराला ५ लाख रुपये, CM/PPCM² स्तराला ४ लाख रुपये आणि सामान्य सदस्यांना १ लाख रुपये अशी आर्थिक मदत दिली जाणार आहे.

विकसित महाराष्ट्राचा अर्थसंकल्प : २०२६

(उर्वरीत)

– जगद्गुरु तुकाराम महाराजांचे देहू येथील जीर्ण घर आणि जन्मस्थानाच्या जतन, संवर्धनासाठी आराखडा तयार करणार

– नाशिक-त्र्यंबक कुंभमेळ्यासाठी भरीव तरतूद

– नवरगाव, रामटेक येथे राज्यातील तिसरी चित्रनगरी विकसित करणार, महाकवि कालिदास यांचे जीवनचरित्र नव्या पिढ्यांना कळण्यासाठी चित्रपट निर्मिती करणार

– रामटेक विकास आराखडा टप्पा-२ ची कामे करणार

– पंढरपूर मंदिर विकास आराखड्यातील पुढील कामे हाती घेणार

– नाशिक : रामकाल पथ विकासाची कामे सुरु

– ५ ज्योर्तिलिंग विकासाची कामे सुरु, महानुभाव पंथीय विविध धार्मिक स्थळांच्या ठिकाणी सुविधांसाठी निधी देणार

– एमटीडीसीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त ५० पर्यटनस्थळी पायाभूत सुविधा निर्मिती

– मराठी भाषेतील साहित्य व ग्रंथ अन्य भाषांमध्ये तसेच अन्य भाषांमधील दर्जेदार साहित्य मराठीत अनुवादित करण्यासाठी 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अकादमी' स्थापन करणार

अजित पवार यांना श्रद्धांजली

– अजित पवार यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे स्मारक उभारणार

– अजित पवार यांच्या नावे गतिमान नागरी सेवा पुरस्कार देणार.

सामाजिक न्याय व कल्याण

– अनुसूचित जाती घटकासाठी २३,१५० कोटी रुपये

– सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे आरक्षण उपवर्गीकरणाच्या शिफारसीनुसार लाभ

– आदिवासी घटकांसाठी २१,७२३ कोटी रुपये

– ओबीसी, धनगर, गोवारी घटकांसाठी भरीव तरतूद

– सारथी, बार्टी, आर्टी, टीआरटीआय, महाज्योती, वनार्टी, अमृत, मार्टी या संस्थांसाठी भरीव तरतूद

– दिव्यांगांसाठी सर्व सुविधा एका ठिकाणी आणण्यासाठी दिव्यांग सहाय्यक संकेतस्थळ, जिल्हा वार्षिक योजनेत १ टक्के निधी राखीव

– तृतीयपंथियांच्या विकासासाठी स्वयंरोजगार, व्यवसायासाठी बीजभांडवल देणार

– आकांक्षित जिल्हे आणि तालुके कार्यक्रमाचा विस्तार करणार. गडचिरोली, नंदूरबार, धाराशिव, वाशीम जिल्ह्यांसोबत आता हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे, परभणी या ६ नवीन जिल्ह्यांचा समावेश. या एकूण १० जिल्ह्यातील ७७ तालुके आणि उर्वरित जिल्ह्यातील १०० तालुक्यांचा गतिमान विकास

– चर्मकला डिझाईन व उत्पादन अद्ययावत केंद्र मुंबईतील बांद्रात स्थापन करणार

– आदिवासी जमातीतील युवांना नाविन्यतेवर आधारित उद्योजक, उद्योग निर्माते घडविण्यासाठी 'भारत इनोव्हेशन, रिसर्च, स्टार्टअप्स फॉर आत्मनिर्भरता-बिरसा' ही योजना

आरोग्य

– राज्यातील २९ महापालिका, २४७ नगरपालिका, १४७ नगरपंचायतींमध्ये राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, आरोग्य विभागाच्या सर्व गुणवत्तापूर्ण सुविधा देण्यासाठी शहरी आरोग्य आयुक्तालयाची स्थापना करणार

– सार्वजनिक आरोग्याच्या सर्वंकष उन्नतीसाठी एम्स, आयआयएमच्या धर्तीवर उच्च गुणवत्तेच्या प्रशिक्षण आणि संशोधनासाठी नागपूर येथे 'महाराष्ट्र आरोग्य सार्वजनिक संस्था' स्थापन करणार. भारतीय सार्वजनिक आरोग्य संस्था यासाठी सहकार्य करणार

– कर्करोग, मधुमेह, हृदयविकार यासारख्या आजारांचे निदान करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या मदतीतून ग्रामीण भागासाठी ४५०० कोटींची प्रगती योजना

– राज्यात डिजिटल सार्वजनिक आरोग्य परिसंस्था निर्माण करण्यासाठी 'महाराष्ट्र डिजिटल आरोग्य तंत्रज्ञान अभियान' राबविणार, रिअल-टाईम डॅशबोर्डच्या आधारे प्रभावी निर्णय आणि संनियंत्रण

– राज्यात ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, ११ महाविद्यालयांची कामे विविध टप्प्यांवर

– महात्मा फुले जनारोग्य योजना : उपचारांची संख्या १३५६ वरुन २३९९, रुग्णालयांची संख्या १७९२ वरुन ४५३७ तसेच ९ प्रकारच्या अवयव प्रत्यारोपणाच्या उपचारांसाठी २२ लाखांपर्यंतचा खर्च राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या राखीव निधीतून करण्यास मान्यता

– स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई या संस्थेच्या इमारतीच्या एकत्रिकरणासाठी बृहद आराखडा तयार करणार

– बीड जिल्हा रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी ३६० खाटांचे रुग्णालय बांधकाम, नर्सिंग कॉलेज, वसतीगृहाचे काम प्रस्तावित

– सातारा जिल्ह्यातील दरे येथे निसर्गोपचार केंद्र, ताणतणाव, जीवनशैलीजन्म आजार, मानसिक आरोग्य तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यसेवांसाठी

– मुंबई महानगर परिसरात सर्वांगिण आरोग्य आणि वेलनेसचे जागतिक केंद्र

आर्थिक

– १ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे दमदार वाटचाल, २०४७ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सची करणार

– शेतीचा जीडीपी ५५ अब्ज डॉलर्सवरुन ५०० अब्ज डॉलर्सवर नेणार

– उद्योग क्षेत्राचे स्थूल उत्पन्न १२३ अब्ज डॉलर्सवरुन १५०० अब्ज डॉलर्सवर नेणार

– सेवा क्षेत्राचे स्थूल उत्पन्न ३१२ अब्ज डॉलर्सवरुन ३००० अब्ज डॉलर्सवर नेण्याचे उद्दिष्ट

– सहाव्या राज्य वित्त आयोगाचा अहवाल कृती अहवालासह पुढील अधिवेशनात सादर करणार, प्रशासकीय सुधारणा आणि आर्थिक विकेंद्रीकरण यातून सक्षम स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती

– २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात ७,६९,४६७ कोटी रुपयांची तरतूद. महसुली जमा : ६,१६,०९९ कोटी रुपये अंदाजित

महसुली खर्च : ६,५६,६५१ कोटी रुपये अंदाजित

४०,५५२ कोटी रुपये तूट अंदाजित

– राजकोषिय तूट स्थुल उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात सरकारला यश. तीनेहमीच १ टक्क्यांपेक्षा कमी

– क्रेन आधारित वाहने यांच्या वाहन किंमतीवर ७ टक्के प्रमाणे एकरकमी कर होता. परंतू मोठ्या किंमतीची वाहने अन्य राज्यात नोंदणी होत असल्याने कराची कमाल मर्यादा ३० लाख प्रस्तावित

– वाहन वितरकास व्यवसाय प्रमाणपत्र ५ वर्षाचे. मात्र कर १ वर्षाचा. त्यामुळे त्याच्या दरात सुधारणा प्रस्तावित

– मुद्रांकांवर दस्त निष्पादित केल्यास अपराधसिद्धीनंतर सक्तमजुरी व शास्तीची तरतूद. या शास्तीच्या रकमेत फेररचना करुन ५००० वरुन १ लाख अशी वाढ. यामुळे कमी मुद्रांकावर दस्त निष्पादन करण्याचे प्रमाण नियंत्रणात येणार.

पायाभूत सुविधा

– शाश्वत शहरी विकासासाठी १० हून अधिक सक्षम प्रादेशिक विकास प्राधीकरणे, ५० हून अधिक सुनियोजित, बहुपयोगी शहरी समूह विकसित करणार, शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सेवा १०० टक्के डिजिटाईज करणार

– जलवाहतूक : १२५ कि.मी.चे जलमार्ग जाळे ३४० कि.मी.चे करणार, २१ जलमार्गावरील २० टर्मिनल्सचे अद्ययावतीकरण, ११ नवीन जलमार्गावर २४ नवीन टर्मिनल्स, यासाठी ६६०० कोटी, मुंबईतील रेडिओ क्लब येथील नवीन जेट्टी डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करणार

– वडाळा, मुंबई येथे जागतिक दर्जाचे स्टार्टअप आणि इनोव्हेशन हब

– मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनची ठाणे ते तलासरी मार्गावरील तीन स्थानके फेब्रुवारी २०२७ पर्यंत पूर्ण होणार. विरार, बोईसर, ठाणे स्थानकाभोवती विकासाचा बृहद आराखडा तयार करणार

– अटलसेतूला जोडून २०० चौरस कि.मी. क्षेत्रात तिसरी मुंबई घडवणार : कर्नाळा, साई, चिरनेर नवनगर आणि नवी मुंबई विमानतळ अधिसूचित क्षेत्र ही ग्रीनफिल्ड शहरे तयार करणार

– वाढवण बंदर : चौथी मुंबई. लॉजिस्टीक्स आणि वेअर हाऊसिंगसाठी विकास केंद्र निर्माण करणार, वाढवण बंदरामुळे १२ लाखांहून अधिक रोजगार, मासेमारांसाठी सातपाटी येथे अत्याधुनिक मत्स्यबंदर, आसपासच्या ४४ गावांत कौशल्य विकासाचे उपक्रम राबविणार

– मरीन शिपयार्ड क्लस्टर विकसित करणार

– मुंबई महानगर प्रदेशात २० लाख झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करणार, १० लाख परवडणारी घरांची निर्मिती करणार, नवीन झोपडपट्टी होणार नाही, यासाठी 'नो न्यू स्लम फ्रेमवर्क' प्रणाली

– वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया मेट्रो ११ : २३,४८७ कोटींचा संपूर्ण भूमिगत प्रकल्प, याचा पुढे धारावी, वांद्रे स्थानक, वांद्रे टर्मिनस असा विकास

– मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रो ८ : २२,८६२ कोटी

– तळोजा ते खांदेश्वर नवी मुंबई मेट्रो २ : ५५७५ कोटी

– मुंबईतील भुयारी मार्ग : ऑरेंज गेट, पूर्व मुक्तमार्ग ते मरीनड्राईव्ह, गोरेगाव-मुलुंड, ठाणे ते बोरीवली, खारघर ते तुर्भे, वांद्रे-वरळी सागरी सेतू ते हायस्पीड रेल्वेस्थानक वांद्रे-कुर्ला संकुल ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई

– मुंबई महानगरात गायमुख जंक्शन ते फाऊंटेन हॉटेल जंक्शन ते पुढे भाईंदर असा अनुक्रमे ६ आणि ९ कि.मी.चा भुयारी मार्ग

– उन्नत मार्ग : शिवडी-वरळी, ऐरोली-कटाई नका, ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटलसेतू ते मुंबई-पुणे द्रूतगती महामार्ग, छेडानगर ते आनंदनगर व आनंदनगर ते साकेत, ठाणे

– सागरी सेतू : मुंबई ते वाढवण बंदर जोडण्यासाठी उत्तन ते विरार सागरी सेतू : ५८,७५४ कोटी, स्वातंत्र्यवीर सावरकर वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू तसेच वर्सोवा-दहीसर-भाईंदर ही कामे वेगाने सुरु

– किनारी मार्ग : बाळकुम ते गायमुख, उलवे किनारी मार्ग

– कल्याण ते लातूर ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्ग तयार करणार

– पनवेल-कर्जत उपनगरीय प्रकल्प ३ बी : १४,९०७ कोटी, यातून बदलापूर-कर्जत, आसनगाव ते कसारा, पनवेल ते वसई, ६९ कि.मी.चा नवीन उपनगरीय कॉरिडॉर

– पुणे-लोणावळा तिसरी आणि चौथी रेल्वेमार्गिका, ५१०० कोटी, पिंपरी-चिंचवड, आकुर्डी, तळेगावला लाभ

– पुणे मेट्रो टप्पा २ : खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडीच्या मेट्रोच्या हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर बसडेपो ते सासवड रोड या प्रकल्पांना मंजुरी/रामवाडी ते वाघोली या ११ कि.मी.च्या मेट्रोला मंजुरी/येरवडा ते कात्रज आणि हिंजेवाडी ते सिंहगड रोड या ५४ कि.मी.च्या दुहेरी भुयारी मार्गाचा डीपीआर तयार करण्यात येत आहे.

– राज्यातील मेट्रो नेटवर्क १२०० कि.मी. वर नेणार, ६००० कि.मी.पेक्षा अधिकचे द्रुतगती मार्गाचे जाळे तयार करणार

– नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दुसर्या टप्प्याची कामे, पुरंदर विमानतळासाठी एसपीव्ही, गडचिरोली विमानतळासाठी भूसंपादन, लातूर, बारामती, अमरावती, यवतमाळ येथे नाईट लँडिंग, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, कराड, नाशिक, शिर्डी, रत्नागिरी, अकोला, यवतमाळ विमानतळांच्या विस्ताराच्या कामांसाठी निधी

– येरवाडा ते कात्रज भुयारी मार्गाचा डीपीआर

– पुणे ते शिरुर उन्नत मार्ग : ५३ किमी. ७५१४ कोटी रुपये

– तळेगाव-चाकण उन्नतमार्ग : २५ कि.मी. ६४९९ कोटी रुपये

– चाकण-शिक्रापूर मार्गाचे सहापदरीकरण : २८ कि.मी. ५२३२ कोटी रुपये

– शिरुर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड महामार्गाचे सहापदरीकरण : १९२ कि.मी. १४,८८६ कोटी

– छत्रपती संभाजीनगर विमानतळ ते वाळूज एमआयडीसी उन्नत मार्गाचे काम दोन टप्प्यात करणार

– हडपसर ते यवत सहापदरीकरण : ३१.५० कि.मी. ५२६२ कोटी

– सोलापूर-तुळजापूर-धाराशिव ८४ कि.मी.चा रेल्वे मार्ग

– समृद्धी महामार्ग : नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली, नागपूर-चंद्रपूर आणि वाढवण बंदराला जोडण्यासाठी तवा-भरवीर मालवाहतूक कॉरिडॉर

– मुंबई महानगराच्या धर्तीवर पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर ग्रोथ हब

– नवीन नागपूर व्यापार व वित्तीय केंद्र

– महाराष्ट्र अमृतकाल रस्ते विकास योजना : ६२७२ कि.मी. द्रुतगती मार्ग, १४,९१९ कि.मी.चे राज्य आणि जिल्हा मार्ग तयार करणार

– १००० पेक्षा अधिक लोकसंख्येच्या गावांना काँक्रिट रस्त्यांनी जोडणार, आशियाई बँकेच्या मदतीने ४५०० कोटींचा कार्यक्रम

– मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ : २३ हजार कि.मी.ची कामे करणार (यापूर्वी टप्पा १ मध्ये ३० हजार कि.मी, टप्पा-२ मध्ये २४५० कि.मी.ची कामे पूर्ण)

– प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग ४ : लोकवस्तीशी न जोडलेल्या वाड्या-वस्त्या बारमाही रस्त्याने जोडणार

– ५ हजार पेक्षा अधिक लोकसंख्येच्या सर्व वस्त्या आणि ४२४७ कि.मी.चे 'पर्यटन परिरथ'ने जोडणार

– पवनार ते पत्रादेवी शक्तिपीठ महामार्ग

– प्रधानमंत्री आवास योजना : २७.८७ लाख घरांना मंजुरी, ३.५७ लाख घरे पूर्ण, पीएम-जनमन आवास योजनेत ५४,१२९ घरे

– नवीन मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेला मंजुरी

– खादी ग्रामोद्योग संस्थांना अर्थसहाय्य देणार

उद्योग

– इन्व्हेस्ट महाराष्ट्र या एकसंध डिजिटल व्यासपीठाची निर्मिती करणार

– १८ अतिविशाल औद्योगिक केंद्र उभारणार

– प्रत्येक जिल्ह्यात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग केंद्र स्थापन करणार, यातून ५० लाख रोजगारनिर्मिती होणार

– दोन नवे आयुक्तालय : सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग उपक्रम आयुक्तालय तसेच सेवा आयुक्तालय निर्माण करणार

– रत्ने व आभूषणे धोरणातून १ लाख कोटींची गुंतवणूक, ५ लाख रोजगारनिर्मिती करणार

– बांबू विकास प्रकल्प : ५०,००० कोटींची गुंतवणूक करुन ५ लाख रोजगारनिर्मिती करणार, औष्णिक विद्युत प्रकल्पात ५ ते ७ टक्के बांबू बायोमासच्या वापराचे उद्दिष्ट. जीआयएस, एमआयएस, ब्लॉकचेन, ड्रोन इत्यादीतून बांबू मूल्यसाखळीचा विकास करणार

– गडचिरोली स्टिल हब : २.६१ लाख कोटींची गुंतवणूक, ७०,८९५ रोजगार निर्मिती. जैवविविधता संवर्धनासाठी ५ कोटी वृक्षलागवड

– मुंबई आणि पुण्यात ५० अब्ज डॉलर्सचे मिडिया टेक आणि एव्हीजीसी केंद्र बनविणार, ३० लाखांहून अधिक रोजगार निर्मितीसाठी नवीन ४०० जीसीसी (जागतिक क्षमता केंद्र) तसेच नवउपक्रम शहरांची उभारणी करणार

– सिंधुदुर्ग, रत्नागिरी या दोन जिल्ह्यांसाठी सिंधुरत्न समृद्ध योजना आणखी ३ वर्षासाठी राबविणार. कोकण विभागातील साकव बांधणी, दुरुस्तीसाठी विशेष कार्यक्रम

हरित महाराष्ट्र

– राज्यात ३०० कोटी वृक्ष लागवड मोहीम हाती घेणार

– २०२९ पर्यंत ५० टक्के आणि २०३५ पर्यंत ६५ टक्के हरित ऊर्जा प्राप्त करण्याचे उद्दिष्ट, ३ लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित

– प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज : महाराष्ट्र देशात दुसरा, ४.५७ लाख घरगुती ग्राहकांकडून १७३५ मे.वॅ. रुफटॉप सोलार स्थापित, ३२०० कोटी रुपये सबसिडी प्राप्त. आता शून्य ते १०० युनिट वीज वापरणार्यांसाठी स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासिय रुफटॉप सोलार योजना मंजूर, यात ५ लाख लाभार्थ्यांना ६३५ कोटींचे अनुदान देणार

– ५५ उदंचन प्रकल्पांसाठी करार, ७८,२१५ मे.वॅ. वीजनिर्मिती अपेक्षित, १.२८ लाख कोटींची गुंतवणूक. ६ प्रकल्पांचे काम सुरु, यातून १०,३०० मे.वॅ. वीजनिर्मिती क्षमता निर्माण

– चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथील सागवान वारशाचे जतन, संशोधन, जनजागृतीसाठी 'टिंबर म्युझियम व झायलॅरियम' उभारणार

– जुने वाहन निष्कासित करुन नवीन वाहन खरेदी केल्यास मोटार वाहन करात १५ टक्के सूट

– नवीन वाहने खरेदी करताना बीएस-४ व त्यावरील प्रदूषण मानके असलेल्या वाहनांना मोटर वाहन करात १६ टक्के, बीएस-३ आणि त्याखालील प्रदूषण मानके असलेल्या वाहनांना मोटर वाहन करात ३० टक्के सूट

– बीएस-४ व त्याखालील वायूप्रदूषणाची मानके असलेल्या परिवहनेतर खाजगी संवर्गातील वाहनांमुळे वायु प्रदूषण होत असल्याने अशा वाहनांवर पर्यावरण करामध्ये दुचाकी वाहनावर २००० रुपयांवरुन ४००० रुपये, हलकी मोटर वाहने ३००० वरुन ६००० रुपये, डिझेल हलकी मोटर वाहनांवर ३५०० वरुन ७००० रुपये करवाढ प्रस्तावित

सुशासन/गतिमानता

– पारदर्शक, गतिमान आणि उत्तरदायी सुशासनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सेवा-प्रवेश नियमांचे एकत्रिकरण, प्रमाणीकरण, सुलभीकरण

– महायुती सरकारमध्ये आतापर्यंत १ लाख २० हजार पदभरती, आता आणखी ७५,००० पदभरती करणार

– इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि एआय विभाग स्वतंत्रपणे स्थापन करणार. त्याला सहाय्यक म्हणून आयुक्तालय देणार, स्वतंत्र माहिती-तंत्रज्ञान संवर्ग करणार

– शासकीय पातळीवर विविध टप्प्यांवर सुलभता यावी यासाठी आपले सरकार २.०, मैत्री २.०, महाडीबीटी २.० हे पोर्टल नव्याने विकसित

– नागरिकांच्या मालमत्तांमधील वाद कमी करणे, मालमत्ता हस्तांतरणामधील गैरव्यवहारांना प्रतिबंध करणे आणि मालमत्तांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र भूमी मालकी हक्कधारी अधिनियम आणणार

– जमिनीचे १०० टक्के व्यवहार संगणीकृत करणे, १०० टक्के ई-ऑफिस, कागदविरहित कामकाजाचे नियोजन

– एआय, क्लांटम संगणन, ड्रोन, स्वयंचलित वाहन, डीपटेकसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात राज्याला जागतिक केंद्र म्हणून विकसित करणार, यासाठी विशेष धोरण आखणार

– सुरक्षित, विश्वासार्ह आणि भविष्यासाठी सज्जतेसाठी राज्याचे सायबर सुरक्षा धोरण तयार करणार

– राज्याच्या सार्वभौम डेटा, अनुप्रयोगांची सुरक्षितता यासाठी नागपूर येथे अत्याधुनिक स्टेट डेटा सेंटर स्थापन करणार

– राज्यात महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी अप्लिकेशन सेंटरची स्थापना करणार

– अमरावती जिल्ह्यातील शिक्षण विभागाची सर्व कार्यालये एकत्रित आणण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख शैक्षणिक संकुलाची उभारणी करणार

सुरक्षा

– नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी तंत्रज्ञानावर आधारित पोलिस व्यवस्था, १०० टक्के डिजिटायझेशन, सक्षम सीसीटीव्ही, सर्व जिल्ह्यांत प्रगत न्यायसहाय्यक केंद्र, आयटीएमएससारख्या तंत्रज्ञानाचा वापर करणार

– बॉडी वॉर्न कॅमेरा : स्मार्ट पोलिसिंग आणि न्यायदानासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने बॉडी वोर्न कॅमेरे

– राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था, मिहान नागपूर येथे, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीचे सौम्यीकरण संशोधन, अभ्यासपूर्ण व्यवस्थापनासाठी.

– राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या धर्तीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या ४ नवीन तुकड्या

..

मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात वापरलेली शेरोशायरी आणि कविता

१) जब इरादा बना लिया उंची उडान का,
फिर देखना फिझूल है कद आसमान का...

.....

२) डर मुझे भी लगा फासला देख कर,
पर मैं बढता गया रास्ता देख कर,
खुद ब खुद मेरे नजदीक आती गई,
मेरी मंजिल मेरा हौसला देख कर

.....

३) प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक, सुशासन या चार सूत्रांना घेऊन कविता

युग नवे प्रगतीचे,
शाश्वत अन् दमदार विकासाचे,
सुशासन अन् सर्वसमावेशकतेचे,
नाविन्यतेचे अन् पारदर्शी प्रामाणिकतेचे,
सूत्र हेच विकसित महाराष्ट्राचे !

महिला सक्षमीकरण आणि त्यासमोरील आव्हाने

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

इतिहासाची पाने उलटताना अरे संसार संसार म्हणत रांधा, वाढा,उष्टी काढा. यातच आपलं सारं आयुष्य झोकून देणाऱ्या महिला आजच्या घडीला आपल्या कार्यकर्तृत्वाने इतिहासात आपलं नाव सोनेरी अक्षरात कोरत आहेत.भारताला कृषीप्रधान देश म्हटलं जातं. शेतीची सुरुवात एका महिलेने केली हे वाचल्यावर नवल वाटायला नको.पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये कुटुंब प्रमुख हा पुरुष असून बाकी कुटुंबातील सर्व सदस्य आर्थिक दृष्ट्या व निर्णय दृष्ट्या त्या पुरुषावर अवलंबून राहायचे. असा एक मानदंडच होता आणि तो आजतागायत आहे. पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून हिमतीने मैदान गाजवणाऱ्या महिलांची आज कमी नाही.हा सर्व शाब्दिक प्रपंच मांडण्यास कारण म्हणजे जागतिक महिला दिन.

महिला दिन साजरा करत असताना पूर्वीच्या काळी महिलाचं अस्तित्व काय होतं हे सुद्धा माहीत असायला हवं.महिलेला पूर्वी चुल आणि मुल सांभाळणारी व्यक्ती, एक परावलंबी व्यक्ती असं समजलं जायचं.महिला वाचली लिहिली तर नवऱ्याच्या तोंडात किडे पडतात. असं सांगून तिला शिक्षणापासून दूर ठेवण्यात आलं अशा अनेक अनिष्ट रूढी,परंपरेने समाज ग्रासलेला असताना अशा परिस्थितीत महिलांना घराच्या बाहेर काढून शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा मूळ धाडस महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या फुले दाम्पत्यांनी केले आणि खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाला सुरुवात झाली.आजच्या घडीला महिला,डॉक्टर,इंजिनिअर, वकील, पोलीस,पायलट,अधिकारी,आमदार खासदार इतकेच नव्हे तर देशातील सर्वोच्च पद पंतप्रधान आणि राष्ट्रपती या पदावर सुद्धा महिला विराजमान झाल्या. खऱ्या अर्थाने याचे सर्व श्रेय महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना जाते.यांच्या कार्याची परतफेड आपण करू शकत नाही पण समस्त महिला वर्गांनी त्यांचे ऋणी असायला हवं.

स्वातंत्र्यानंतर भारत देश आपली मान उंचावून स्वतःच्या पायावर उभारण्यासाठी सज्ज होत होता.त्यावेळी महिलांच्या सन्मानार्थ महिलांना आरक्षण,संपत्तीमध्ये समान वाटा, पोटगी,प्रसुती रजा, योग्य वयात लग्नाची तरतूद, शैक्षणिक हक्क सर्वात महत्त्वाचे म्हणजे मतदान करण्याचा अधिकार आपल्याला सहज मिळाला. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधानाने महिलांना घटनात्मक अधिकार दिले. स्वातंत्र्य,समान हक्क,शिक्षणाची संधी दिली. अशा अनेक तरतुदी महिलांच्या उन्नतीसाठी कायद्याद्वारे करण्यात आले.यासाठी अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाला आंदोलने,निदर्शने करावी लागली. या देशांमध्ये महिलांना माणूस म्हणून आत्मविश्वासाने जगता यावा त्यांनाही पुरुषाप्रमाणे सर्व हक्क अधिकार मिळावे.यासाठी हिंदू कोड बिल बाबासाहेबांनी संसदेत सादर केले परंतु संसदेत हे बिल पारित न झाल्यामुळे महिलांच्या जगण्याला न्याय न मिळाल्याने भारताचे पहिले कायदेमंत्री डॉक्टर भीमराव आंबेडकर यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला असे करणारे भारताचे पहिले कायदेमंत्री होते. आजच्या घडीला बाबासाहेबांचा आदर्श सध्याच्या मंत्र्यांनी घेतला तर महिला समोरील अनेक प्रश्न मिठतील.

बदलते युग पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव आणि ५त्र्ची दुनिया यामुळे महिला दिनाची उत्सुकता,गांभीर्यता सगळीकडे वेगाने पसरली.या दिनाचे औचित्य साधून संबंध जगभरात भारतात देखील वेगवेगळे कार्यक्रम राबवले जातात. महिला दिनाच्या संदर्भाने मुद्दा येतो तो महिला सक्षमीकरणाचा. याबाबत शासन आठवडाभर महिला सक्षमीकरणाचा चौथा टप्पा चालवत आहे.महिला सक्षमीकरण म्हणजे काय? तर महिलेला आर्थिक दृष्ट्या,शैक्षणिक दृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या सक्षम बनवणे स्वावलंबी बनवणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. यावरून असं लक्षात येतं जवळपास निम्म्याहून अधिक टक्का महिलावर्ग सक्षम नाही याचं कारण म्हणजे पुरुषप्रधान संस्कृतीतील जुन्या चालीरीती चुकीच्या प्रथा परंपरा अशा गोष्टींच्या स्त्रीया स्वतः शिकार होतात आणि बळी पडतात जोपर्यंत महिलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होत नाही. तोपर्यंत महिला खऱ्या अर्थाने सृजनशील, आत्मविश्वासू आणि सक्षम होणार नाहीत.

भारतातील इतिहासात डोकावून पाहत असताना सुरुवातीच्या काळी कर्मकांड आणि अंधश्रद्धेला महिला बळी पडल्या. त्यानंतर मोठ्या प्रमाणात स्त्रीभ्रूण हत्या, कौटुंबिक हिंसाचार आणि लिंगभेद ही आव्हाने आज ही कायम आहेत यावर मात करण्यासाठी सामाजिक मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे. सध्याच्या घडीला स्त्रियांच्या समोरील सर्वात मोठे संकट म्हणजे स्त्रियांवरील होणारे अत्याचार, बलात्कार हे प्रश्न केवळ स्त्रियांसमोर नसून भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. आधुनिकतेच्या दुनियेत वावरताना हाय हॅलो च्या जमान्यापेक्षा दोन्ही हात जोडून नमस्कार म्हणणारा समाज हा लय भारी. अशिक्षित असो अथवा सुशिक्षित लहान मुलगी असो अथवा वयस्कर स्त्री यापैकी एकाही प्रवर्गातील महिला*मी सुरक्षित आहे* असं अभिमानाने म्हणू शकत नाही. यासाठी आता सर्व महिलांनी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचे बाकी आहे.

कोणत्याही कठीण प्रसंगी स्वतः कोलमडून न पडता जबाबदारीचं ओझं आपल्या खांद्यावर पेलण्याची धमक स्त्रियांमध्ये असते याचं उत्तम उदाहरण महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी दाखवून दिल.महिलाराज काय असतं याचं उत्तम उदाहरण म्हणजे नेवासा तालुक्यातील मोरया चिंचोरे हे गाव. संपूर्ण गावाचा गावगाडा पाहण्याचा अधिकार या महिला वर्गाकडे आहे. खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाचे उत्तम उदाहरण आहे असं म्हणणं वावग ठरणार नाही.

भारतातील सर्व महिलांना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

– सौ. शुभदा प्रशांत जैनजांगडे
९८३४२४७९९६

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

२०४७ चे व्हिजन ३०० अब्ज डॉलर्स अर्थकारण, समाजकारण आणि राजकारणाचा मेळ घालणारा देवा भाऊंचा पायाभूत अर्थसंकल्प : राजा माने

तज्ज्ञ मंडळांनी घेतला सहभाग; अर्थसंकल्पावर मांडल्या भूमिका

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर स्वतःचा अर्थसंकल्प सादर करण्याचा इतिहास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घडविला २०४७ चा भारत डोळ्यासमोर ठेवून नरेंद्र मोदींनी ५०० अब्ज डॉलर्सचे अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन इकॉनॉमिक्स या आद-ेशाला पूरक ठरणारा व राज्याला तीनशे अपडेट डॉलरच्या अर्थव्यवस्थेकडे नेण्याचा उद्देश ठेवणारा अर्थसंकल्प विधानसभेत सादर केला.

अर्थसंकल्पानंतर व्यापक दृष्टिकोन टाकणारा विचार भवन परिसरात विशेष स्टुडिओ पाठवून थेट प्रसारणाचा उपक्रम मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीने घेतला.

या कार्यक्रमात संपादक माध्यम तज्ज्ञ व राजकीय विश्-लेषक तसेच डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे अध्यक्ष राजा माने सहभागी झाले होते. शेतकऱ्यापासून उद्योजकापर्यंत आणि तृतीयपंथी पासून दिव्यांग समाज घटकापर्यंत तसेच राज्यातील सर्व जाती धर्मांची व लाडक्या बहिणींची काळजी वाहणारा हा अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्प समाजकारण आणि राजकारणाचा उत्कृष्ट मेळ देवा भवानी घातला आहे, अशी प्रतिक्रिया राजामाने यांनी चर्चेत सहभागी होताना व्यक्त केले.

सह्याद्री वाहिनीने कार्यक्रम निर्माते डॉक्टर आलोक खोब्रागडे व दूरदर्शनच्या टीमचे माननीय आभार मानले व अर्थसंकल्पाच्या सर्व मुद्द्यांना स्पर्श करत संजय मुस्कुटे यांनी थेट प्रसारणाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन केले.

अर्थतज्ज्ञ चंद्रशेखर टिळक, वर्षा माळवदे, निशिता राजे, यांनी चर्चेत मोलाची योगदान दिले. यामध्ये विरोधी पक्ष नेते ही सहभाग झाली होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंतीच्या शासनातर्फे करण्यात येणाऱ्या पूर्वतयारीचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतला आढावा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची यंदा १३५ वी जयंती साजरी होत असून राज्य शासनातर्फे भिमजयंतीच्या केलेल्या पूर्वतयारीचा आढावा आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी सहयाद्री अतिथीगृह म लबार हिल येथे आयोजित शासकिय बैठकीत घेतला. यावेळी पोलीस, रेल्वे पोलीस, मुंबई महापालिका, राज्य शासनाच्या समाज कल्याण विविध विभांगाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी पुज्य भंते डॉ. राहुलबोधी महाथेरो, माजी राज्यमंत्री अविनाश म हातेकर, समन्वय समितीचे नागसेन कांबळे, रिपाइंचे मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, राजेंद्र जाधव ; प्रकाश मोरे, दयाल बहादुरे, सुरेश बारसिंग, उषाताई रामलु, कामगार नेते रमेश जाधव, प्रकाश जाधव, शिवसे-नेचे नेते रवि गरुड, रिपाइंचे घनश्याम चिरणकर आदि अनेक मान्यंवर उपस्थित होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमीत्त मुंबईत चैत्यभूमी येथे, नागपुरमधील दिक्षाभुमी यासह राज्यभरांतील विविध स्मारकात राज्य शासनातर्फे पुरविण्यात येणा-या विविध सेवा सुविधा आणि सुरक्षेच्या तयारीचा ना. रामदास आठवले यांनी आढावा घेतला. मुंबईत चैत्यभूमी तसेच गोराई येथील पॅगोडा येथे भिमजयंती निमीत्त हजारो बौध्द उपासक, भिम अनुयायी भेट देतात. त्यांच्या सुरक्षेचा विविध सुख सुविधा पुरविण्याबाबत ना. रामदास आठवले यांनी माहिती घेतली. १४ एप्रिल रोजी चैत्यभूमी येथे दिवसभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यात नामवंत कलाकारांसह आंबेडकरी चळवळीतील भिमशाहीरांनाही आंबेडकरी लोक कलावंताना संधी देण्याची सुचना करण्यात आली. तसेच भिमजयंती निमीत्त चैत्यभूमी येथे १४ आणि १५ एप्रिल रोजी कार्यक्रम आयोजित करण्याची परव-ानगी राज्य शासनातर्फे देण्यात यावी. याबाबत आपण जिल्हाधिका-यांना पत्र पाठवणार असल्याची माहिती ना. रामदास आठवले यांनी दिली.

आंबेडकरवादी लेखक डॉ. दत्तात्रय गायकवाड यांच्या दोन पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे येथील समीक्षा फाउंडेशनच्यावतीने इंदुबाई तुकाराम गायकवाड यांच्या चौथ्या स्मृतिदिनानिमित्त बुद्धवंदना, पुस्तक प्रकाशन ; शालेय साहित्याचे वितरण आणि आंबेडकरवादी कवी संमेलन पार पडले.

याप्रसंगी डॉ. गायकवाड लिखित 'अंतरापेक्षा दिशा महत्त्वाची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन आणि कार्य' तसेच संपादित केलेल्या सम्यक प्रकाशनचे 'असे होते आपले बाबासाहेब' या दोन पुस्तकांचे प्रकाशन पाली अभ्यासक हनुमंत भालेसैन; प्रा. नीलम पंडित ; संविधान प्रचारक संदीप बर्वे ; मारुती बनसोडे ; एस एन डी टी चे प्रा. आर आर सोनकांबळे ; सहाय्यक ग्रंथपाल डॉ. चिकटे यांच्या हस्ते संपन्न झाले.

याप्रसंगी बुद्धवंदनेनंतर विशेष म्हणजे आंबेडकरवादी कवी संमेलन पार पडले. यात हर्षानंद सोनवणे; सुनील गायकवाड;

मोहन दुसाने; अनंत जाधव ; बाबासाहेब जाधव आणि सुधीर भालेकर या कवीने सहभाग घेऊन आपल्या लक्षवेधी कवितांचे वाचन केले.

कराड वैभव साप्ताहिकाचे संपादक एडवोकेट सिंहासने ; प्रा.नीलम पंडित ; संदीप बर्वे ; मारुती बनसोडे, या मान्यवरांची मनोगते श्रवणीय होती.

डॉ.गायकवाड यांनी ग्रंथाविषयी बोलताना म्हणाले की, सेवानिवृत्तीनंतरचे माझे सोळा-वे पुस्तक प्रकाशन होत आहे. देशाला जशी संरक्षणाकरता आरम ाराची गरज आहे. तसे समाजाला देखील साहित्याची नितांत गरज आहे. समाज घडविण्यात यासाठी साहित्याची भूमिका महत्त्वाची आहे. शब्द समाजाचे भले करतील काय? यासाठी साहित्यिकांनी लिहीत राहावे. साहित्य हे निरंतर चालणारी चळवळ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार तळागाळातील समाज घटकापर्यंत पोहोचवायचे असतील तर लिहित रहाणे अनिवार्य आहे. पुस्तके माणसाला दृष्टी देतात. डॉ. आंबेडकरांचे विचार अफाट व अचाट आहेत. यासाठी आपण सगळ्यांनी त्यांच्या विचाराचे वाचन, मनन, चिंतन, संशोधन व लेखन करायला हवे'.

याप्रसंगी हनुमंत भालेसेन यांनी पाली भाषेचा प्रचार प्रसारिसाठी पाच-सहा पुस्तके प्रकाशित करून योगदान करण्याचा प्रयत्न बोलून दाखवला.

तसेच प्रा. नीलम पंडित यांनी संविधान जागृतीसाठी प्रचार प्रसार व लेखन आवश्यक असल्याचे सांगितले कार्यक्रमात साहित्याचे अभिजात साहित्याचे भाषांतर इंग्रजीतून देखील व्हायला हवे..यासाठी मी भाषांतर करत असते. डॉ. मारुती बनस-ोडे यांनी डॉ. गायकवाड यांच्या दोन्ही पुस्तकाला शुभेच्छा देऊन आंबेडकर चळवळ ग्रामीण भागात राबवली सुमारे दोनशे पोतराजांचे केस कापून त्यांना माणूसकीच्म ाया मार्गावर आणले. चिवरी येथील प्राणीहिंसा थांबविण्यासाठी आंदोलने केली. अंधश्रद्धा निर्मूलन समितीत काम करताना डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या स्मृती जागवल्या या कार्यक्रमात इंदुबाई गायकवाड यांच्या स्मृतिनिमित्त पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याची वितरण झाले. यात समीक्षा गायकवाड यांनी प्रास्ताविक केले तर अध्यक्ष हनुमंत भालेसे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे धार्मिक विधी बौद्धाचार्य राजेंद्र सोनवणे आणि निलेश गायकवाड यांनी सूत्रसंचालन व आभार पार पाडले.

महिलांनी अन्यायाविरोधात आवाज उठवावा : जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंह रजपूत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/प्रतिनिधी : आज आपल्या देशात ९९% कायदे महिलांच्या बाजूने आहेत. या कायद्यांची माहिती ए.आयच्या माध्यमातून मिळू शकते, ती घेतली पाहिजे आणि त्याचा फायदा शस्त्र म्हणून महिलांनी उपयोग केला पाहिजे. महिलांवरील अत्याचाराला आळा घालायचा तर समाजव्यवस्था सुरक्षित पाहिजे, संवेदनशीलता, संस्कार व संस्कृतीची जपणूक ही आपली जबाबदारी आहे असे प्रतिपादन जिल्हा सरकारी वकील तथा सी.बी.आय. कौन्सिल ॲड. प्रदीपसिंह रजपूत यांनी केले.

रूपाभवानी मंदिराजवळील श्री. सिद्धेश्वर वुमन्स इंजिनिअरिंग कॉलेजम ध्ये महिला दिनानिमित्त फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वतीने व श्री. सिद्धेश्वर वुमेन्स कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, सोलापूर यांच्या सहकार्याने जागतिक महिला दिनानिमित्त कै. आवाबाई वाडिया कर्तृत्वशालिनी महिला पुरस्काराचे वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या माजी अध्यक्षा प्रा. डॉ. नभा काकडे या होत्या.

यावेळी व्यासपीठावर श्री. सिद्धेश्वर वुमेन्स कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचे प्राचार्य डॉ. टी. पी. चव्हाण, म ार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, फायनान्स डव्हायझर सपना चिट्टे, सदस्या प्रा. डॉ. विजया महाजन, डॉ. राजीव प्रधान, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

ॲड. प्रदीपसिंह रजपूत यांच्या हस्ते सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ज्ञ डॉ. मंजुश्री यशवंत कुलकर्णी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, भाजपा शहराध्यक्षा तथा स्वीकृत नगरसेविका रोहिणी रामचंद्र तडवळकर, पाखर संकुल संस्थेच्या अध्यक्षा शुभांगी जयकृष्ण बुवा, ज्येष्ठ समाजसेविका कॉ. ड. सरिता मोकाशी, विद्यमान नगरसेविका वंदना अजित गायकवाड, बालविकास प्रकल्प सदस्या ड. सुवर्णा हेमंत कोकरे, यांचा सन्मानपत्र, सन्म ानचिन्ह, शाल व बुके देवून सत्कार करण्यात आला. यावेळी प्रथमच सिद्धेश्वर इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थिनींनी तयार केलेल्या रोबोटच्या साहाय्याने सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व बुके देण्यासाठी वापर करण्यात आला तसेच सिद्धेश्वर कॉलेजच्या पी.एचडी प्राप्त शिक्षकांचा महिला दिनानिमित्त सन्मान करण्यात आला.

सत्काराला उत्तरदेताना डॉ. मंजुश्री यशवंत कुलकर्णी, रोहिणी रामचंद्र तडवळकर व वंदना अजित गायकवाड यांनी या पुरस्काराने आमची जबाबदारी वाढली आहे असे सांगितले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ. नभा काकडे म्हणाल्या की, पद्मश्री आवाबाई वाडिया यांनी कुटुंब नियोजनाचे उद्दिष्ट ठेवून फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाची स्थापना केली. महिलांच्या आरोग्य सम स्येतून गंभीर सामाजिक व आर्थिक प्रश्न निर्माण होतात याची जाणीव झाल्याने संस्थेच्या कार्यात व्यापकता आली.

यावेळी माजी नगरसेवक अरुण भालेराव, अजित गायकवाड आदींसह प्राध्यापक, शिक्षक व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत प्राचार्य डॉ. टी. पी. चव्हाण यांनी केले. प्रास्ताविक प्रा.डॉ.विजया महाजन यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सोनाली पाटील यांनी केले तर आभार प्रा. अमृता निंबार्गीकर यांनी केले.

निफाड महावितरण उपविभागाच्या वतीने लाईनमन दिवस साजरा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : महावितरण निफाड उपविभागाच्या वतीने ०४ मार्च रोजी लाईनमन दिवस या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी निफाड तालुक्यातील सर्वच कक्षाचे लाईनमन यांचा यथोचित गौरव करण्यात आला.

लाईनमन सर्वांच्या आयुष्यात उजेड पेरणारे प्रकाशदूत : डॉ. महेश बनकर

वैज्ञानिक प्रगती आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात, आज सर्व गोष्टी विद्युत विजेवर अवलंबून आहे. परंतु या विद्युत विजेचा समतोल पुरवठा आणि अचूक नियोजन ज्यांच्या माध्यम ातून होते. असे सर्व लाइनमन हे समाजातील सर्वच व्यक्तींच्या आयुष्यात उजेडरुपी आनंद पेरण-ारे प्रकाशदूत असल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ. महेश बनकर यांनी केले.

महावितरण निफाड उपविभाग येथे आयोजित ०४ मार्च लाईनमन दिवस या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून डॉ. महेश बनकर बोलत होते..... पुढे ते म्हणाले की, . आपल्या स्वतःचे व कुटुंबाचे भावनिक व मानसिक आरोग्य आनंदी ठेवण्यासाठी, कौटुंबिक संवाद होणे गरजेचे आहे.. म ुलांचे बालपण व शिक्षण ज्येष्ठांचे आरोग्य यासाठी प्रयत्नशील राहून स्वतःच्या कुटुंबात देखील आपण आनंदाचा प्रकाश पेरावा असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

यावेळी व्यासपीठावर, कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ लाईनमन पांडुरंग हांडगे, चांदवड विभागाचे कार्यकारी अभियंता योगेश निकम, निफाड उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता सुनील राऊत, कक्ष अभियंते हेमंत शिनकर,जितेंद्र बोरसे, साकेत पाटील, किरण पवार, श्रीमती गायत्री चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यकारी अभियंता योगेश निकम यांनी यावेळी लाईनमन यांनी प्रत्यक्ष काम करताना घ्यावयाची काळजी, कामातील अडचणी व त्यावरील उपाय योजना याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच उपकार्यकारी अभियंता सुनील राऊत, पांडुरंग हांडगे, विलास वडघुले आणि लाईनमन यांनी यावेळी मनोगते व्यक्त केली,

कार्यक्रमाची सुरुवात म ान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. उपस्थित सर्व लाईनमन यांचा भेट वस्तू देऊन यथोचित गौरव व सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदरजी लटपटे, नाशिक मंडळाचे अधिक्षक अभियंता राजेश थुल यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. प्रास्तविक प्रवीण आहेर, सूत्रसंचालन जितेंद्र बोरसे यांनी केले तर आभार अभिजित घुगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी उपविभागातील सर्वच लाईनमन बांधव, यंत्रचालक व बहुसंख्य कर्मचारी श्रोत उपस्थित होते.

अर्थसंकल्पात पंढरपूर विकास आराखड्यास पंढरपूरची टाकळी उड्डाणपलास रस्त्याला ५० कोटी १६ लाखाची तरतूद

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेला शब्द पाळला शिवसेना संपर्कप्रमुख महेश साठे यांच्या मागणीला यश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास प्रबोधनकार ठाकरे चौक ते टाकळी चौक रस्त्याचा समावेश करावी अशी मागणी आषाढी यात्रेमध्ये महा पूजेसाठी आलेल्या श्री तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्याकडे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख महेश नाना साठे यांनी केली होती.

यावेळी टाकळी येथे झालेल्या शिवसेना मेळाव्यात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टाकळीकर यांना दिलेला शब्द पाळला असून अर्थसंकल्पात पंढरपूर विकास आराखड्यास गती दिली असून. पंढरपूर ते टाकळी उड्डाणपलासह रस्त्याची ५० कोटी १६ लाख रुपये ची तरतूद केल्याने सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख महेश साठे यांनी शिवसेना नेते एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचेही आभार मानले.

याप्रसंगी बोलताना महेश साठी म्हणाले की शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी इतिहासात प्रथमच टाकळी ग्रामपंचायतला मोठा निधी दिला आहे. यामध्ये टाकळी पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास आली असून १००० बेडचे रुग्णालय व तसेच टाकळी नगरपंचायत पुण्याला मार्ग लवकरच पूर्णत्वास येणार असल्याचे सांगितले.

यावेळी महेश साठी आणि विरोधकांना कामातूनच उत्तर देणार असेही सांगितले. यावेळी टाकळी गा-वचे माजी सरपंच संजय साठे, रोहन बचुटे बालाजी बागल, धनाजी पाटील सारंग महामुनी, पांडुरंग शिंदे प्रदीप भोसले, इंगोले सर मारुती माने निंबाळे, बापू डोंगरे विशाल माने, दादा कदम आकाश कदम जयकुमार सपकाळ.

दरम्यान अर्थसंकल्पात टाकळी उड्डाणपुलासह रस्त्याला निधी देण्याचे घोषणा झाल्यानंतर टाकळी ग्रामस्थांनी व महेश साठे यांच्या निवासस्थानी एकत्र येऊन त्यांचे आभार मानले व पेढे वाटून जल्लोष साजरा केला. दक्षिण काशी पंढरी नगरी श्री विठ्ठल रुक्मि णीच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक मोठ्या संख्येने दाखल होत असतात. येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुख सुविधा मिळाव्यात यासाठी शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी इतिहासात प्रथमच पंढरपूरची वारी अगोदर पाणी दौरा करून येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा एक वेगळा फायदा पडला. घालून दिला आहे राज्यातील पहिली ग्रामपंचायत शिवसेना टाकळी ओळखले जाणाऱ्या टाकळी ग्रामपंचायतला महेश साठे यांच्या माध्यमातून इतिहासात प्रथमच सर्वात मोठा निधी मिळाल्याने. लवकरच गावचा काया प्लॉट होणार आहे त्याम ुळे. टाकळी ते नागरिकांकडून शिवसे-नेचे आभार मानले जात आहे.

पंढरपुरातील वाहतूक शाखेचे दोन पोलीस कर्मचारी निलंबित

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरांमध्ये मागील आठवड्यात गोपाळपूर शहरा जवळ वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी वाहन चालकाकडून दोन हजार रुपये रोख, व दोन हजार रुपयाचे चलन नो एंट्री मध्ये आला म्हणून घेतले. यावर चर्चा सहा चाकी ट्रक आडवा लावून रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनाच्या दरम्यान मोहोळचे आमदार राजू खरे अडकले त्यावेळी हा सर्व प्रकार घडत होता. वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांनी तेव्हा चालकाला मारहाण केली हे सर्व सोशल मीडियावर व्हायरल झाले. याबाबत विधानसभेत आमदार अभिजीत पाटील आमदार राजू खरे यांनी आवाज उठवला तात्काळ सभापतींनी चौकशीचे आदेश दिले. यामध्ये पोलीस कॉन्स्टेबल विजय कांबळे, पो. ना. रविकांत वाघमारे यांना निलंबित करण्यात आले आहे.

पंढरपूर उपविभागीय अधिकारी सहाय्यक अधीक्षक श्री प्रशांत डगळे यांनी याबाबत वाहतूक पोलिसाचा विलंबनाचा प्रस्ताव जिल्हा पोलीस प्रमुखाकडे पाठवला होता. त्यानंतर जिल्हा पोलीस प्रमुखांनी यावर दोन कर्मचाऱ्यांना निलंबित केल्याची माहिती. सहाय्यक अधीक्षक प्रशांत डगळे यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातून नागरिकांचे समाधान

कासेगांव -करकंब मंडळातून १ हजार ८६४ विविध सुविधा पुरवण्यात आल्या

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन कामाला वेग देण्यासाठी आणि नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानातंर्गत आज तालुक्यातील कासेगांव, करकंब या मंडळातून १ हजार ३०२ विविध सेवा व ५६२ विविध दाखले असे एकूण १ हजार ८६४ सेवा व विविध दाखले देण्यात आले असल्याची माहित प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

या अभियानातंर्गत निकाली काढण्यात आलेले फेरफार २०१, सातबारा मधील दुरुस्ती २४, डिजिटल सातबारा २२४, ८ अ उतारे १७६, विविध दाखले ५६२, एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत निकालात काढण्यात आलेले अर्ज ७, भूसंपादन प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्यात आलेली प्रकरणे २, सामाजिक योजना ४५, शिधापत्रिका २२१, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन व कृषी सिंचन योजना १०६, आभा कार्ड, एच.बी, तपासणी व औषधोपचार १४४, ई- मोजणी फेरफार नकाशा १५२,आदी सेवा व दाखले देण्यात आले. यामध्ये कासेगाव मंडळातून ८३२ तर करकंब मंडळातून १ हजार ३२ विविध सुविधा एकाच छताखाली पुरवण्यात आल्याचे प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले.

१४ मार्चला भाळवणी, पुळुज शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी खर्डी, पटवर्धन कुरोली, शुक्रवार दि. १७ एप्रिल रोजी भंडीशेगाव, रोपळे शुक्रवार दि. ८ मे रोजी पंढरपूर तर शुक्रवार दि. १५ मे रोजी तुंगत चळे या मंडळात शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी पंढरपूर तालुक्यातील संबधीत मंडळातील जास्तीत जास्त नागरिकांनी या महाराजस्व समाधान शिबिर मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार श्री. लंगुटे यांनी केले आहे.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य आदिनाथ देशमुख, पंचायत समिती सदस्य प्रमोद देशमुख, शहाजी मुळे, राहुल पूरवत, माजी जि.प. सदस्य हरिभाऊ गावंदरे, बाळासाहेब देशमुख, भूमी अभिलेख उपाधिक्षक पूजा आवताडे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, दीपक शिंदे, दुय्यम निबंधक श्री निराळी, सहा. महसूल अधिकारी दादा गावंदरे, तसेच संबंधित मंडळाचे मंडळ अधिकारी व तलाठी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

निफाड नगरपंचायतीची कर वसुलीसाठी धडक मोहीम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायतीस आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीने तसेच वित्त आयोगाचा निधी, शासनाकडून मिळणारी अनुदाने मिळविणेसाठी मालमत्ता कर व पाणीपट्टी कराची वसुली करणे बंधनकारक आहे.मात्र निफाड नगरपंचायतीकडे मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली कमी असून वसुलीसाठी नगरपंचायत प्रशासनचे प्रयत्न सुरु असून नागरिकांनी तातडीने कर भरणेचे आवाहन नगरपंचायतीने केले आहे.

आज रोजी निफाड नगरपंचायतीची मालमत्ता कर वसुली ४५% झाली असून पाणीपट्टी वसुली ३०% झाली आहे. नगरपंचायतीच्या उत्पन्नावरच शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा, रस्ते दुरुस्ती, दिवाबत्ती तसेच इतर मूलभूत सुविधांचे नियोजन अवलंबून असते. तसेच केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनांच्या निधीसाठीही स्थानिक उत्पन्नाचे प्रमाण महत्त्वाचे मानले जाते. निफाड शहरातील नागरिकांनी वेळेत कर भरल्यास निफाड शहरातील विकासकामांना गती मिळू शकते.

निफाड शहरातील स्वच्छता,पाणीपुरवठा व्यवस्था,विविध विकासकामे ही नगरपंचायत करावरच अवलंबून असलेणे नागरिकांनी कर भरून नगरपंचायतीस सहकार्य करावे.
– सौ.कांताबाई अशोक कर्डिले नगराध्यक्षा, निफाड नगरपंचायत

निफाड शहरातील नागरिकांनी आपली जबाबदारी समजून कर भरणेस पुढाकार घ्यावा.आपला कर नियमित भरून प्रशासनास सहकार्य करून शहराच्या विकासामध्ये आपले योगदान द्यावे.
– अनिल रंगनाथ कुंदे पा. उपनगराध्यक्ष, निफाड नगरपंचायत

निफाड नगरपंचायतमार्फत विविध वसुली पथके स्थापन करून थकबाकीदारांकडून कर वसुलीस प्राधान्य देणेत येत आहे.शहरातील थकबाकीदारांचे नळ कनेक्शन कट करणे,मालमत्ता जप्ती करणेची कार्यवाही सुरु करणेत आली असून नागरिकांनी कर भरून नगरपंचायतीस सहकार्य करावे.
– धिरज भामरे मुख्याधिकारी, निफाड नगरपंचायत

पंढरपूर तालुका पोलिसांची तारापूर येथील हॉटेल रविराज वर कारवाई १६ हजार रुपयांचे अवैध दारू जप्त

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील आगामी रंगपंचमी या उत्सवाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे तारापूर सुस्ते रोडवर हॉटेल रविराज या ठिकाणी पंढरपूर तालुका पोलिसांनी रेड करून एकूण १६००० रुपयाची देशी विदेशी दारू बियर असे एकूण १६ हजार रुपये ची अवैद्य दारू कृपयांची अवैध दारू जप्त केलेले असून त्याबाबत पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५ प्रमाणे आरोपीवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत सदरची कारवाई माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी श्री प्रशांत दगडी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टीवाय मुजावर एपीआय शहाजी गोसावी श्रीमती रेडेकर मॅडम पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले पोलीस हवालदार परशुराम शिंदे ब्रह्मदेव काळे संतोष चव्हाण गावडे संजय गुटाळ सतीश चंदनशिवे यांच्या पथकाने कारवाई केली आहे.

वळसंग पंचायत समिती भाजप कृतज्ञता मेळावा आचेगांव येथे संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

आचेगांव : वळसंग जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकित भारतीय जनता पार्टीला मोठे यश मिळून वळसंग जिल्हापरिषद गटा मधून रामप्पा चिवडशेट्टी व वळसंग गणामधून बलवान गोतसुर्वे हे मोठया विक्रमी मताधिक्याने निवडून आल्याबद्दल नूतन पंचायत समिती सदस्य बलवान गोतसुर्वे यांचे पिताश्री माजी जिल्हापरिषद सदस्य कै. लक्ष्मणराव गोतसुर्वे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून आचेगाव ग्राम स्थांच्या वतीने आचेगांव येथे अक्कलकोट नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी व कार्यक्रमाचे अध्यक्ष भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार यांच्या प्रमुख उपस्थित कृतज्ञता मेळावा आयोजित करून वळसंग गणातील सर्व गावातील भाजप प्रमुख पदाधिकारी व सहकारी मंडळी यांचे कृतज्ञपर सन्मान म्हणून सत्कार करण्यात आले त्याच बरोबर सेवाभावी वृत्तीतुन गोतसुर्वे परिवाराच्या वतीने मतदारांप्रती आपले कर्तव्य म्हणून आचेगांव ग्रामस्थ ग्राम पंचायत अधिकारी रुक्मिणी कांबळे, पोलीस पाटील प्यारन मुल्ला, श्रीदेवी खोबण, महादेवी जळगोडर व प्राथमिक आरोग्य केंद्र आचेगांव व वळसंग वतीने वैद्यकीय अधिकारी डॉ. बि. एन. पाटील व त्यांचे सहकारी काशिनाथ गाडे,कटारे, श्रीमती संगीता खांडे, श्रीमती केत, रोहित देशपांडे, काशीनाथ हबू आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, समुदाय आरोग्य अधिकारी, आशा व गटप्रवर्तक यांच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी व सर्व रोग निदान शिबीर तसेच सिद्धेश्वर ब्लड बँक सोलापूरच्या सत्यम गायकवाड यांच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आयोजित कृतज्ञता मेळावा व राबवलेल्या सामाजिक उपक्रमाबद्दल आमदार सचिन कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी व युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार यांनी समाधान व्यक्त केले.यावेळी जिल्हापरिषद सदस्या श्रुती भोरगुंडे,जिल्हापरिषद सदस्य नेताजी भाऊ खंडागळे,पंचायत समिती सदस्य पंचप्पा धनशेट्टी, पंचायत समिती सदस्य विजय राठोड भंडारकवठे सरपंच भीमाशंकर बबलेश्वर, नटराज नरोळे, वळसंग सरपंच जगदीश अंटद, माजी सरपंच श्रीशैल दूधगी, जगनाथ गायकवाड,सरपंच विश्रांती पाटील, उपसरपंच रफिक मुल्ला, दत्तात्रय पाटील, माजी सरपंच रमेश क्षीरसागर, हारून बिराजदार, जयशंकर पाटील, शशिकला विधाते,हुसेन पटेल तंटामुक्त अध्यक्ष पंडित गोतसुर्वे, सिद्धेश्वर ब्लड बँकेचे सत्यम गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कै. लक्षणराव गोतसुर्वे यांच्या प्रतिमेचे पूजन अक्कलकोट नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले व आरोग्य शिबीरचे पूजन जिल्हापरिषद सदस्य रामप्पा चिवडशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक दत्तात्रय पाटील यांनी केले तर मनोगत अल्ताफ पटेल, महादेव होटकर, रामजी गायकवाड, लक्ष्मण हुल्ले, पंडित कोरे, सागर कोळी,विकास गोतसुर्वे, ऐश्वर्या वाघमारे - गोतसुर्वे आदीने व्यक्त केले.अध्यक्षीय मनोगतात महेश बिराजदार यांनी आचेगांवची एकता बलवान गोतसुर्वे यांची पक्षनिष्ठा, पक्षअभियान व सामाजिक उपक्रम आणि थेट जनसंपर्क या त्यांच्या जमेच्या बाजू पाहता बलवान गोतसुर्वे यांना उमेदवारी देण्यात सर्वांचे नेते आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना सोयीचे झाले असल्याची भावना व्यक्त केले.यावेळी मलकाप्पा कोडले,बसवराज मिरजे, परमेश्वर पाटील सर, दगडू मुगळे, पप्पू तेलंग,हणमंत जमादार, विशाल माने, श्री सिद्धू तिपरादी, मल्लू ढब्बे, कलय्या स्वामी, विरेश बागलकोटी,सिद्धू वाघमारे, शांतकुमार गायकवाड आदिसह वळसंग पंचायत समिती गणातील व परिसरातील भाजप चे सर्व प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शावरसिद्ध पाटील, चंद्रकांत शिलेणी टेलर,सागर कोळी, भगवान गोतसुर्वे, पंडित गोतसुर्वे, महिबूब पटेल, सुरेश मोची, रायप्पा पुजारी, कुलदीप पाटील सर्व ग्रामपंचायत आजी माजी सदस्य पदाधिकारी व ग्रामस्थ आदीने परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सागर कोळी यांनी केले.

पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम

महिलांनो स्वावलंबी जीवन जगण्याची कला आत्मसात करा : मलकप्पा भरमशेट्टी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात कौटुंबिक जीवनात अर्थकारणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यासाठी महिलांनी व्यवसायाभिमुख शिक्षण घेऊन स्वावलंबी जीवन जगण्याची कला आत्मसात केली पाहिजे असे प्रतिपादन मलकप्पा भरमशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक . मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय तसेच उच्च माध्यमिक विद्यालय आणि गिरीजामाता प्राथमिक मराठी विद्यालयाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला सन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर . प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप, ज्येष्ठ शिक्षक रवीकिरण दंतकाळे, कुमार जाधव उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाबाई यांच्या प्रतिमेस वंदन करण्यात आले. त्यानंतर बोलताना भरमशेट्टी म्हणाले की, शिवणकाम, ब्युटी पार्लर,मेहंदी, फॅशन डिझाइनिंग, बेकरी, संगणक प्रशिक्षण, डिजिटल मार्केटिंग अशा अनेक क्षेत्रांत महिलांना प्रशिक्षण घेऊन स्वतःचा व्यवसाय सुरू करता येतो. त्यासाठी सरकार आणि विविध संस्था कौशल्य विकासाचे कार्यक्रम राबवत आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक निशिगंधा सोमेश्वर यांनी केले सूत्रसंचलन जेष्ठ शिक्षिका कल्पना स्वामी यांनी केले तर आभार प्रतिभा माने यांनी मानले कार्यक्रमास सलोनी शहा, शितल टिंगरे, विद्या बिराजदार, विजयालक्ष्मी वाले आदी महिला शिक्षिका उपस्थित होते.

जि. प. शाळा तांदूळवाडी येथे महिला आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब : प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे, ता. ७ तालुक्यातील तांदुळवाडी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र मोहा अंतर्गत उपकेंद्र बोर्डा यांच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय महिला दिन व सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीचे अवचित्य साधून गावातील किशोरवयीन मुली व महिला यांचे आरोग्य तपासणी शिबिर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे संपन्न झाले. सदर शिबिरात गावातील सर्व महिला आणि किशोरवयीन मुलींनी उस्फुर्त सहभाग नोंदवत आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. या आरोग्य शिबिरात रक्तगट, हिमोग्लोबीन, मधुमेह, रक्तदाब, कॅन्सर सारख्या विविध प्रकारच्या तपासण्या करण्यात आल्या. तसेच उपस्थित महिला व किशोरवयीन मुलींना आरोग्याबद्दलचे आणि स्व अस्तित्वाचे महत्त्वपूर्ण असे मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी अंगणवाडी सेविकांनी पुरक पोषण आहार जनजागृती करण्यासाठी वैशिष्ट्य पुर्ण स्टॉलची मांडणी केली.चौरस आहारचे मार्गदर्शन केले.या संपूर्ण कार्यक्रमासाठी मोहा प्राथमिक आरोग्य केंद्राचे मेडिकल ऑफिसर डॉ सुमित मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बोर्डा उपकेंद्राचे आरोग्य सेवक संतोष फलफले, रोहिणी शिंदे गावातील अंगणवाडी कार्यकर्ती श्रीमती मंदाताई खोसे, सुरेखा काळे अशा कार्यकर्त्या अनुराधा भोसले, यास्मिन शेख, अनिता काळे मदतनीस सागरबाई लिमकर, शिल्पा माने यांनी सहकार्य केले हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री संतोष भोजने यांनी पुढाकार घेतला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपक्रमशील शिक्षिका श्रीमती अशा पवार, श्रीमती रसिका आगरकर, श्री संतोष मोहिते सर श्री सयाजी शिंदे सर मध्यान्ह भोजन कर्मचारी रुक्मिणी डिकले,मयुरी डिकले, धनश्री डिकले यांनी परिश्रम घेतले.